संक्षिप्त फौजदारी प्रकरण क्र. ८८३/२०१४
महाराष्ट्र सरकार –वि– सुभाष
निशाणी क्र. २२

सरकार तर्फे साक्षीदार क्र. ०६
मी याद्वारे शपथपुर्वक निवेदन करतो की,
माझे नावः रामदास
वडीलांचे नावः उत्तमराव
आडनावः मिसाळ
माझे वयः ४३ वर्ष, व्यवसायः शेती,
राहणारः जानेफळ दाभाडी, ता. भोकरदन, जि. जालना.

**सरतपासणी सरकारी वकिल श्री. ए. एन. गवळी यांच्याद्वारे**

दिनांक २४.०८.२०१४ रोजी मी माझ्या गावी होतो. मला पंचनामा करण्यासाठी पोलीसांनी बाणेगाव फाटा येथे बोलवले होते. त्यावेळी माझ्यासोबत माधवराव हिवाळे उपस्थीत होते. आमच्या गावातील वाघमारे यांच्या भावाचा अपघात झाला होता व त्याचा पंचनामा होता. घटनास्थळ मला फिर्यादीने दाखवले. अपघात घडलेल्या ठिकाणी कोणत्याही विशिष्ट खुणा नव्हत्या. सदरचे अपघातस्थळ हे भोकरदन–राजुर मार्गावर बाणेगाव फाटा येथे पुर्वेस होते.

०२. घटनास्थळाच्या पुर्वेस बाणेगावकडे जाणारा रस्ता, पश्चिमेस देऊळगाव ताडकडे जाणारा रस्ता व दक्षिण–उत्तर भोकरदन ते राजुर रस्ता आहे. निशाणी क्र.२१ कडील पंचनाम्याखाली माझी सही आहे. त्यामध्ये नमुद मजकुराप्रमाणे कार्यवाही झाली होती.
सरतपास पुर्ण

**उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. जी. एस. ठोंबरे यांच्याकडून**

०३. माझे गाव ते घटनास्थळ हे अंतर अंदाजे ८ कि.मी. इतके आहे. घटनास्थळापासून माझ्या गावापेक्षा केदारखेडा हे गाव जवळ आहे. हे म्हणणे खरे आहे की, केदारखेडा ते तथाकथीत घटनास्थळ याच्यादरम्यान रस्त्याच्या दुतर्फा हॉटेल आहे. मला पंचनाम्यासाठी लेखी नोटीस प्राप्त नव्हती. मला त्यावेळी पोलीसांचा फोन आला होता. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा २० ते २५ दिवसांनी झाल्याने निश्चित अपघात कोठे घडला हे समजुन येत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांचे व माझे संबंध चांगले आहेत. हे म्हणणे

खरे नाही की, माझ्यावर देखील खटला दाखल आहे. फिर्यादी माझा मित्र आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीच्या सांगण्यावरुन मी सही केली. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा पुर्वीच लिहुन ठेवला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष पंचनाम्याची कार्यवाही झाली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

स्वाक्षरीत/–

दिनांकः १२.१२.२०२५

(मयुरेश आर. काळे)

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, भोकरदन